**नागपूर, दि. 09 डिसेंबर, 2015**

# गोडया पाण्यात मोती संवर्धन उपक्रम राबविणाऱ्या युवकाला मदत करु

**- एकनाथराव खडसे**

नागपूर, दि.09 डिसेंबर : शेतीला पूरक व्यवसाय म्हणून गडचिरोली जिल्हयातील दुर्गम खेडयात गोडया पाण्यात मोती संवर्धन उपक्रम राबविणाऱ्या संजय गंडाटे या युवकाला शासकीय शेत तळे व अन्य प्रकारची आवश्यक मदत करण्यात येईल, असे काल राज्याचे कृषी व महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी नागपुरात सांगितले. लगेचच त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना याबाबतीत लवकरात लवकर प्रस्ताव सादर करावा, अशा सूचनाही दिल्या.

गडचिरोली जिल्हयातील पारडी या खेडयात राहून गेली चार वर्षे स्वबळावर गोडया पाण्यामध्ये मोती संवर्धन करणाऱ्या संजय मुखरु गंडाटे या उपक्रमशील तरुणाला खडसे यांनी नागपुरातील आपल्या देवगिरी निवासस्थानी बोलावून घेतले व या अनोख्या उपक्रमाची तपशीलवार माहिती घेतली.

राज्यातील विशेषतः दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना घरबसल्या हा शेतीपूरक उद्योग करणे शक्य आहे. त्यामुळे या उपक्रमाचा प्रचार प्रसार झाला पाहिजे, असे खडसे यावेळी म्हणाले.

संजय गंडाटे यांनी हा कुटीरोद्योग आपल्या पुरताच मर्यादित ठेवलेला नाही. मोती तयार होतील असे शिंपले त्यावर आवयक ती प्रकीया करून ते गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवतात. प्रक्रिया, वाहतूक इत्यादी खर्चासह एक मोती प्रवण शिंपला 70 रुपयांना विकला जातो. मात्र, शेतकऱ्यांना असे शिंपले कमी किंमतीत उपलब्ध करुन देता यावेत म्हणून शासनाने काही प्रमाणात अनुदान द्यावे. तसेच, हा शेती पुरक व्यवसाय मोठया प्रमाणात करता यावा यासाठी शासनाने शेततळे उपलब्ध करुन द्यावे, अशी विनंती यावेळी गंडाटे यांनी मंत्री महोदयांना केली.

विशेष म्हणजे वकिलीचा व्यवसाय न करता गंडाटे यांनी हा आगळावेगळा उपक्रम हाती घेतला आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल त्यांना 2012 साली कृषी गौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे.

------

**कृपया प्रसिध्दीसाठी** **जनसंपर्क अधिकारी**